दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५१ वा | शुक्रवार दि. ७ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## राहुल गांधींनी घेतली शरद पवारांची भेट

**दिल्ली ।** राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवारांच्या बंडानंतर शरद पवार सध्या काही कारणास्तव दिल्ली दौऱ्यावर आहेत.



पवारांच्या दिल्ली दौऱ्यात विविध नेते त्यांची भेट घेताना दिसत आहेत. यामध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही शरद पवारांची त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी भेट घेतली. यादरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, विरोधी पक्षनेते जितेंद्र आव्हाड हेसुद्धा उपस्थित होते. भेटीने राजकीय वर्तुळात चर्चांणा उधान आलं आहे.

## न्यूज कॉलम

### देशी दारूचे दुकान फोडणारे दोघे ताब्यात

**पिंपळनेर ।** सटाणा रोडवरील एका बियरबारच्या मागे असलेले देशी दारूचे दुकान फोडून दुकानातील रोकडसह दीड लाखाची दारू लंपास करणार्या दोघा तरूणांना पिंपळनेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. देशी दारूच्या दुकानाचा अर्जुन बापु पवार व संदेश सुनिल मोरे दोघे रा.दुबई भिलाटी, पिंपळनेर या दोघांनी १५ हजाराच्या रोकडसह १ लाख ४६ हजार ८०० रूपये किंमतीची देशी दारू मिळून एकूण १ लाख ६१ हजार ८०० रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला.

### वीजचोरी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**धुळे ।** महावितरणच्या लघुदाब वाहिनीवर आकडा टाकुन तसेच वीज मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणार्या आठ जणांवर साक्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिम्मत भटुपरी गोसावी, रघुनाथ दला गढरी, सखाराम दामु माळी, भावलाल नागो न्हावी, पुजा राजेंद्र पिंपळसे, शांताराम भिला पवार, सखाराम दामु माळी, किशोर रामदास पवार दोघे रा.बोरकुंड, ता.जि. धुळे यांनी महावितरणच्या लघुदाब वाहिनीवर आकडा टाकून तसेच वीजमिटरमध्ये फेरफार करून वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले.

# धुळे मनपाच्या स्थायी समितीच्या सभेत सभापतींनी आमदारांवर साधला निशाणा

**धुळे । प्रतिनिधी**

सदस्य सुनिल बैसाणे यांनी शहरातील अतिक्रमण व अपघाताचा मुद्दा मांडल्यानंतर सभापती किरणताई कुलेवार यांनी आमदारांवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या की, शहराचे आमदार विकासकामांमध्ये खुपच व्यस्त आहेत. त्यामुळे ते पळासनेर येथील मृतकांच्या नातेवाईकांना भेटण्यासही गेले नाहीत. दुसरीकडे पालकमंत्री धुळ्यात येऊन गेले, त्यांनी रुग्णालयात जखमींची विचारपूस केली. परंतु, आमदारांना काही पडली नसल्याचेही त्या म्हणाल्या.

महापालिकेकडून आकारण्यात आलेल्या वाढीव घरपट्टीमुळे शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड रोष आहे. याविरोधात आमदारांनीही दोन दिवसांपुर्वी उपोषण केले. यासंदर्भात स्थायी समितीच्या सभेत सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर प्रशासनाने खुलासा केला. त्यात सांगितले की, वाढीव घरपट्टीबाबत खा.डॉ.सुभाष भामरे यांनी महापालिकेत बैठक घेतली होती. यासंदर्भात ते मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री स्तरावर बैठक घेणार आहेत. कारण हा शासनस्तरावरील विषय आहे. तथापि, १० जुलै रोजी मुख्यमंत्री धुळ्यात येणार असल्याने त्यानंतर लवकरच बैठक आयोजित केली जाईल. व बैठकीत जो निर्णय होईल, त्या निर्णयाची महापालिकेकडून अंमलबजावणी केली जाईल, असा खुलासा प्रशासनाने केला. दरम्यान, पुढील काळात निवडणूक असल्याने धुळेकरांना वाढीव घरपट्टीपासून दिलासा मिळण्याची शक्यता यातून व्यक्त होत आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, नगरसचिव मनोज वाघ, उपायुक्त संगिता नांदुरकर, पल्लवी शिरसाठ, सदस्य हर्षकुमार रेलन, सुनिल बैसाणे, किरण अहिरराव, कल्याणी अंपळकर, साबीर खान, वसीम बारी, नाजियाबानो पठाण, फातेमा अन्सारी, विजय जाधव, दगडू बागुल, रंगनाथ ठाकरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विषय पत्रिकेवर एकूण नऊ विषय होते. - वाहतूकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण काढावे अन्यथा सत्ताधारी असलो तरी मुख्यमंत्र्यांना निवेदन देवू, असा इशारा भाजपाचे माजी सभापती सुनिल बैसाणे यांनी आज स्थायी समितीच्या सभेत दिला. शहराच्या पाणी प्रश्नावर आज पुन्हा एकदा विरोधकांनी भाजपावर निशाणा साधला यामुळे सत्ताधारी विरोधक भिडले. नगरसेवक सुनिल बैसाणे यांच्याशी काँग्रेसचे वसीम बारी, साबीर भंगारवाले यांचा जोरदार शाब्दीक वादही झाला. मालमत्ता कराचा फेरविचार करावा व धुळेकरांना दिलासा द्यावा अशी मागणी सदस्यांच्या वतीने करण्यात आली. आमदारांना अपघात ग्रस्तांचा कळवळा राहिला नसून ते त्यांच्या कामात व्यस्त आहेत. विविध प्रश्नांवर आमदारांना उपोषणाला बसण्याची नैतिकता आहे काय यावर प्रशासन गप्प कसे बसले यावेळी सदस्यांनी केला. पाण्यापासून विविध आजार होत असून पाणी वितरणात अनियमितता आहे. दुषित पाण्यामुळे उद्भावणार्या समस्येवर तातडीने उपाय योजना व्हायला हवी. शहरातील नाले सफाई होत नाही, केवळ गोड गोलून टोलवा टोलवी केली जाते. ज्या ठिकाणी अतिक्रमणे काढली आहेत, त्याठिकाणी मातीचे ढिग जसेच्या तसे ठेवण्यात आले असून ते तातडीने उचलण्यात आले नाहीत असे सभागृहात निर्दशनास आणून देण्यात आले.



### मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमण हटवा!

**सुरवातीला सुनिल बैसाणे यांनी शहरातील मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणाचा विषय मांडला. ते म्हणाले की, शहरातील देवपूर, साक्रीरोड, आग्रारोड आदी मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करुन काही व्यवसायिकांनी दुकाने थाटली आहेत. यातून भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती आहे. दुर्दैवाने असा अपघात झाल्यास समृध्दी महामार्गावरील अपघातापेक्षाही भयानक असू शकतो. त्यामुळे प्रशासनाने याची गांभीर्यता लक्षात घेत दोन दिवसात अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी, यासंदर्भात जिल्हा पोलीस अधिक्षकांनीही पत्र द्यावे. अन्यथा १० जुलै रोजी मुख्यमंत्री धुळ्यात येत आहेत. त्यांना यासंदर्भात निवेदन दिले जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.**

### शुध्द पाणी का दिले जात नाही?

**यावेळी नाजियाबानो पठाण यांनी शहरातील अनियमित व दुषित पाणी पुरवठ्याचा प्रश्न उपस्थित केला. त्या म्हणाल्या की, शहरात वीज जाणे, पंप नादुरुस्त होणे या कारणांमुळे अनियमित पाणी पुरवठा होत आहे. शिवाय दुषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत आहे. यातून साथीचे आजार बळावण्याची भीती आहे. नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात पाणीपट्टी वसूल केली जात असताना त्यांना शुध्द पाणी का दिले जात नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावर प्रशासनाने खुलासा करताना सांगितले की, शहरातील विविध भागात दोन ते पाच दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. तथापि, वीज पुरवठा खंडीत होत असल्याने काही भागात उशीराने पाणी पुरवठा होतो. शिवाय पाणी पुरवठा करताना त्याची टेस्टींग केली जाते. त्यानंतरच पाणी पुरवठा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान,नाजियाबानो पठाण ह्या पाणीप्रश्नाबाबत बोलत असताना सुनिल बैसाणे हे मध्येच बोलायला उभे राहीले. त्यामुळे मुस्लिम नगरसेवकांनी त्यांना, महिलांचा आवाज दाबू नका, असे बजावले. यावरुन सत्ताधारी व विरोधी नगरसेवक यांच्या शाब्दिक चकमक उडाली. सभा उशीरापर्यंत सुरु होती.**

# शिरपूर तालुक्यातील वाघाडीच्या तरुणाला सिक्कीममध्ये वीरमरण

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील वाघाडी गावचे रहिवाशी तथा भारतीय सैन्य दलाचे लान्स नायक मनोज संजय माळी यांना आज वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी सिक्कीम येथे कर्तव्य बजावत असतांना वीर मरण आले आहे. या घटनेची माहिती वाघाडी गावात येताच माळी कुंटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला अन् गावावर शोककळा परसरली.

याबाबत मिळालेल्या माहिती नुसार २४ मार्च २०१९ ला भारतीय लष्करात भरती झालेले मनोज संजय माळी हे लान्स नायक या पदावर कार्यरत होते. त्यांची सिक्कीम येथे नियुक्ती करण्यात आली होती. सिक्कीम येथे लान्स नायक मनोज संजय माळी हे उंच डोंगराळ प्रदेशात कर्तव्य बजावत असताना त्यांचा अचानक पाय घसरला. आणि ते थेट ५०० ते ६०० फूट खोल दरीत कोसळले. या घटनेत जबर जखमी होवून त्यांचा जागीच मृत्यू झाला. सोबतच्या लष्कराकडून त्वरीत शोध सुरू करण्यात आला. आज दुपारी साडे बारा वाजेच्या सुमारास लान्स नायक मनोज माळी यांचा मृतदेह शोध पथकास मिळून आला. यानंतर सिक्कीम येथील लष्कराच्या रुग्णालयात त्यांचा मृतदेह नेण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, या घटनेची माहिती आज दुपारी वाघाडी (ता. शिरपूर जि.धुळे) येथे कुटुंबीयांना कळवण्यात आली. तरुण मुलाच्या मृत्यूने माळी कुटुंबीयांवर दुःखाचा अक्षरशः डोंगर कोसळला. हे वृत्त गावात वाऱ्यासारखे पसरले आणि अवघे गाव माळी कुटुंबीयांना धीर देण्यासाठी एकत्र आले. शहिद जवान मनोज माळी यांच्या पश्चात वडील संजय बुधा माळी, भाऊ चेतन आणि आई सुरेखा माळी हे तिघे जण आहेत. वडील गावातच शेती करतात. लान्स नायक मनोज माळी यांचं पार्थिव उद्या वाघाडी गावात आणले जाणार असल्याची प्राथमिक गावकऱ्यांनी दिली आहे. शहिद जवान मनोज माळी यांच्या पश्चात वडील संजय बुधा माळी, भाऊ चेतन आणि आई सुरेखा माळी हे तिघे जण आहेत. वडील गावातच शेती करतात.

# राज्यात प्रतिबंधित साडेसहा लाखांची सुगंधी सुपारी नेणारा कंटेनर पकडला





### सोनगीर टोलनाक्याजवळ कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या सुगंधित सुपारीची पाकिटे इतर मालासह नेणारा कंटेनर सोनगीर पोलिसांनी आज पहाटे पकडला. साडेसहा लाखांच्या सुपारी सह १६ लाख ४० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. महाराष्ट्रात खरेदी विक्री व साठा करण्यास प्रतिबंधीत असलेली सुगंधीत सुपारी मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात येत असल्याची माहिती सोनगीर पोलिसांना मिळाली.

सोनगीर पोलीस ठाण्याचे पथकाने सोनगीर टोल नाक्यावर सापळा रचला. आज पहाटे अडीचच्या सुमारास पोलिसांनी कंटेनर (एमएच१३/डीक्यु ३२४०) थांबविला. त्याची तपासणी केली असता त्यात इतर मालासह सुगंधीत सुपारीचे पाकीटे लपविले होते.

पोलिसांनी ते ताब्यात घेतले एकुण ६ लाख ४० हजार ८०० रुपये किंमतीच्या ४० गोण्या सुपारीचे पाकीटे मिळाले. वाहन चालक शिवाजी गोविंद गवळी (वय ४३, रा. कोलेगाव, पलवा सीटी, डोंबिवली ता. कल्याण जि.ठाणे) ताब्यात घेत कंटेनर पोलिसांनी जप्त केला. १० लाख रुपयांचा ट्रक व सुगंधीत सुपारीचा माल असा एकुण १६ लाख ४० हजार आठशे रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त केला अन्न व औषध प्रशासन (म.राज्य) अन्न सुरक्षा अधिकारी किशोर हिंमतराव बाविस्कर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सहाय्यक निरीक्षक गणेश फड तपास करीत आहेत. पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली सहय्यक पोलीस निरीक्षक फड, हवालदार संजय देवरे, अमरीश सानप, प्रवीण सोनवणे, विजयसिंग पाटील, सुरज सावळे, प्रदिप धिवरे, अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बाविस्कर यांनी कारवाई केली.

# मेंढपाळावर चाकू हल्ला ; पाच जणांवर गुन्हा दाखल

**दोंडाईचा ।** शिंदखेडा तालुक्यातील अंजनविहरे येथे मेंढपाळास हाताबुक्क्यांनी मारहाण करून चाकू हल्ला केला. त्याला उजव्या बोटाला दुखापत करत जखमी केले. अंजनविहरे येथील पाच संशयितांवर गुन्हा दाखल झाला आहे.

शिंदखेडा तालुक्यातील अंजनविहरे शिवारात बारकू आना ठेलारी (वय ३५) यांच्या घराला आजूबाजूला लावलेले काटे काढून त्यातील सामान घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथील संतोष हाटकर, अनिल संतोष हाटकर, शिवाजी संतोष हाटकर, लिलाबाई संतोष हाटकर, शिवाजी यांची पत्नी सर्व रा.अंजनविहरे ता.शिंदखेडा अशांनी बारकू ठेलारी यांना मारहाण केली. वरील पाच जणांनी एकत्रितपणे येऊन अंगावर धावून हल्ला केला. त्यांना हाताबुक्क्यांनी व लाथांनी मारहाण करून शिवीगाळ करत दमदाटी केली.

अनिल संतोष हटकर याने धमकी देऊन त्याच्या खिशातील चाकूने जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या उजवा हातावर वार केला. वार चुकून तो वार उजव्या आताचे मधल्या बोटावर बसला यात ते दुखापती होऊन जखमी झाले. शिवीगाळ, दमदाटी करून खाली जमिनीवर पडून हाताच्या पंजावर त्याने आणलेल्या मोटरसायकलचे पुढील चाक चालून घेऊन गेला. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन गायकवाड हे करीत आहे.

# मनपाच्या सहाही विभागात अतिक्रमण विभागाची कारवाई

### अनधिकृत पथविक्रेते, जाहिरात फलक हटविले

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक महापालिकेच्या पंचवटी, पश्चिम, पूर्व, सातपूर, नवीन नाशिक आणि नाशिक रोड विभाग या सहाही विभागात काल दि. ६ रोजी अतिक्रमण विभागाने अनधिकृत पथविक्रेत्यांवर कारवाई केली. पंचवटी विभागात आरटीओ ते राहू हॉटेल बोरगड मार्गावर कारवाई करुन अनधिकृत विक्रेत्यांना हटविले. यावेळी जाहिरात फलकही जप्त करण्यात आले. दोन गाडी भरुन साहित्य जप्त करण्यात आले.

जप्त केलेल सदर साहित्य अतिक्रमण विभागाच्या आडगाव येथील गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले. मनपा प्रभारी आयुक्त तथा प्रशासक भाग्यश्री बानायत यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विभाग उपायुक्त करुणा डहाळे यांच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात आली. पंचवटी विभागात अशी कारवाई एक दिवसा आड करणार असल्याची माहिती पंचवटी विभागीय अधिकारी योगेश रकटे यांनी दिली. योगेश रकटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाचे निरीक्षक प्रवीण मोरे, पथक प्रमुख उमेश खैरे यांनी कारवाई केली.

नागरिकांनी स्वत:हून अनधिकृत बांधकामे, पत्र्याचे शेड, टप-या अशा प्रकारचे अतिक्रमण काढून घेण्यात यावे. अन्यथा अतिक्रमण पथकाद्वारे कारवाई करण्यात येईल तसेच रस्त्यावरील विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण विभाग उपायुक्त करुणा डहाळे यांनी दिला आहे. मनपाच्या सहाही विभागात अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे. नाशिक पश्चिम विभागातही काल विभागीय अधिकारी नितीन नेर यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापूर रोड, कॉलेज रोड भागात कारवाई करण्यात आली. दोन गाड्या साहित्य जप्त करण्यात आले. स्टील काऊंटर, लोखंडी काऊंटर, शेगडी, टेबल, खुर्ची, छत्र्या स्टॅण्ड असे साहित्य जप्त करण्यात आले. अतिक्रमण निरीक्षक विकी जाधव, प्रभाकर बागुल, जिवन ठाकरे, विनायक जाधव, सुनील कदम, जावेद शेख यांचा कारवाईत सहभाग होता. नाशिकरोड येथेही काल शिवाजी चौक आणि विभागीय कार्यालयाच्या आजूबाजूच्या अनधिकृत फळविक्रेते यांना हटविण्यात आले. तसेच सातपूर आणि नवीन नाशिक विभागातही वाहतुकीस अडथळा ठरणारे अनधिकृत फेरीवाले, भाजी विक्रेते, फळ विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात येऊन वाहतुकीचा मार्ग मोकळा करण्यात आला.

# अंजनेरी ब्रह्मगिरी रोपवे झाला तर राष्ट्रपती पुरस्कार परत करेन

### शंकर बाबा शिंदे यांची घोषणा

**नाशिक । प्रतिनिधी**

जटायूंचा अधिवास, अंजनेरीची जैवविविधता, ब्रह्मगिरीची पवित्रता अबाधित राखण्यासाठी प्रस्तावित अंजनेरी ब्रह्मगिरी रोपवेला नाशिक, त्रंबकेश्वर मधील सर्व पर्यावरण संस्थांचा विरोध सुरू आहे. नुकतीच याबाबत पर्यावरण प्रेमींनी वनमंत्र्यांची भेट घेतली. नाशिक जिल्हाधिकारी यांना याबाबत सर्वांची बैठक बोलावून अहवाल वनमंत्र्यांना सादर करण्याचे आदेश दस्तुरखुद्द वनमंत्र्यांनी दिलेले आहेत. ब्रह्मगिरी मेटघर ग्रामस्थांनी या आधीच रोपवे विरोधात ठराव करून या रोपवेस विरोध दर्शविलेला आहे. गडदुर्ग संवर्धनात काम करणाऱ्या शासन नियुक्त समित्यांनीही ठराव करून या रोपवेस उघड विरोध दर्शविला हे विशेष.

नाशिक येथील पर्यावरण प्रेमींनी जटायू



गिधाड पक्षाचे महत्त्व विशद करण्यासाठी अंजनेरी येथे सफर जटायूंची हा उपक्रम काल आयोजित केला होता. या उपक्रमास प्रतिसाद देत खोरीपाडा येथील जैवविविधता व गिधाड संवर्धनासाठी प्रसिद्ध राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शंकर बाबा शिंदे यांनी सर्व उपस्थित ग्रामस्थ, पर्यावरण प्रेमींना मार्गदर्शन केले. अंजनेरी पर्वताची दुर्मिळ जैवविविधता व येथील जटायू पक्षांचा अधिवास अंजनेरीसाठी, अंजनेरीच्या शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे असे यावेळी शिंदे यांनी सांगितले. आयुर्वेदिक दुर्मिळ औषधी वनस्पती संवर्धनासाठी जटायू पक्षांच्या सेवेसाठी आम्हाला शासनाकडून राष्ट्रपती पुरस्कार दिला जात असतांना त्यांनाच रोपवे रुपी विकासाने उध्वस्त केले जात असेल तर अशा पुरस्कारांची गरज काय? असे पुरस्कार परत करणेच योग्य ठरेल असे मत याप्रसंगी शिंदे यांनी व्यक्त करून शासनास हा प्रकल्प इतरत्र सुरू करण्याचे आवाहन केले. यावेळी या भागातील ज्येष्ठ कवी पत्रकार पर्यावरण प्रेमी देवचंद महाले यांनी आपली संस्कृती पर्यावरण वाचविण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे असे आवाहन केले. गावातील ज्येष्ठ हनुमंत भक्त शंकर बाबांच्या उपस्थित अरविंद निकुंभ यांनी ग्रामस्थांना रोपवे हटाव अंजनेरी ब्रह्मगिरी बचाव मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. युवा वन्यजीव अभ्यासक जयेश पाटील यांनी अन्नसाखळीतील गिधाडांचे महत्त्व विशद करून या भागातील गिधाड नष्ट झाल्यास ग्रामस्थांना रोगराईस सामोरे जावे लागेल अशी भीती व्यक्त केली. अतिदुर्मिळ जैवविविधतेने संपन्न भागात रोपवेची गरज नसतांना जनतेचा पैसा ग्रामस्थांच्या मूलभूत सोयीसुविधांसाठी खर्च करण्यासाठी जनसेवकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे गरुड झेप प्रतिष्ठानचे डॉ. संदीप भानोसे यांनी सांगितले. यावेळी शहाजी, तुषार पिंगळे, सोमा कुऱ्हाडे, मनीष बाविस्कर, जगबीर सिंग, रमेश अय्यर यांनी यावेळी तीव्र विरोध दर्शविला. या जटायू सफरीत प्रमुख पाहुणे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शंकर बाबा शिंदे, पर्यावरण प्रेमी व कवी देवचंद महाले, गरुड झेप प्रतिष्ठानचे डॉ.संदीप भानोसे, अरविंद निकुंभ, हिरवांकुरचे नीलाय बाबू शहा, गिव्ह संस्थेचे रमेश अय्यर, मनीष बाविस्कर, तुषार पिंगळे, वन्यजीव सामाजिक संस्था जयेश पाटील, मानव उत्थान मंचचे जगबिर सिंग, तुषार गायकवाड, गणेश चव्हाण, हेमंत कोलते, आदीत्ये केदारे, वैशाली कुऱ्हाडे यांच्यासह असंख्य अनेक संस्था प्रतिनिधी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# वेल्हाणे येथील पती-पत्नीची गळफास घेवून आत्महत्या

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंडाणे-वेल्हाणे येथे पती-पत्नीने एकत्र आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. मुलं झोपलेली असताना घरात गळफास घेवून दोघांनी आपली जीवनयात्रा संपविली. ही घटना उघडकीस आली.

जितेंद्र बाळू पाटील (३०) व टिना जितेंद्र पाटील (२५) या दोघा पती-पत्नीने आत्महत्या केली. त्यांना ६ वर्षीय मुलगी व ३ वर्षीय मुलगा आहे. घरगुती भांडणातून या दोघांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. आत्महत्येपूर्वी जितेंद्र पाटील याने आपल्या लहान भावाला आत्महत्या करत असल्याचा फोनवर मॅसेज केला. भावाने तात्काळ आपल्या मित्राला फोन करुन घरी जाण्याचे सांगितले; तोवर दोघांनी गळफास लावलेला होता. सदर घटनेची माहिती मिळताच पीआय दत्तात्रय शिंदे, पीएसआय विजया पवार, हे.कॉ. सुनील जावरे आदी घटनास्थळावर दाखल झाले होते. दोघा पती-पत्नीचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयाकडे रवाना करण्यात आले. दरम्यान, शेतकरी असलेले जितेंद्र पाटील व त्यांची पत्नी टिना पाटील यांच्या संसारवेलीवर दोन निरागस बालकं आहेत. मात्र, त्यांचाही विचार न करता दोघांनी आत्महत्या का केली? मुलांचाही त्यांना विचार करु वाटला नाही का? अशी हळहळ ग्रामस्थ व्यक्त करत होते.

## 'लोकसभे'साठी तयारी

ईडी सारख्या संस्थांच्या चौकशीचा ससेमिरा टाळण्यासाठी भाजपत काही जण गेले असे शरद पवार यांनीच म्हटले आहे. कदाचित ते खरे असले तरी त्यामुळे विरोधकांची शक्ती क्षीण झाली आहे. शरद पवार हे चित्र बदलू शकतील का? महाराष्ट्रात चार वर्षांत दोन पक्ष फुटले. शिवसेना फुटली त्यावेळी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांना त्याची कल्पना नव्हती. आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यावर अध्यक्ष शरद पवार चकित झाले. फुटिर आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी पक्ष प्रयत्न करत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह काही आमदारांच्या पात्रतेचा किंवा अपात्रतेचा निर्णय अजून झालेला नाही, राष्ट्रवादीच्या आमदारांबाबत कधी निर्णय लागेल ते सांगता येत नाही. वाढलेल्या संख्याबळामुळे सध्या राज्य सरकार अधिक मजबूत झाले आहे. ताज्या फुटीमागेही भारतीय जनता पक्ष आहे हे सर्वांनी ओळखले आहे. शिंदे गट फुटण्याच्याही आधी अजित पवार भाजपच्या संपर्कात होते असे आता राष्ट्रवादीच्याच गोटातून हळूहळू बाहेर येत आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी पक्ष संघटना बळकट करण्यासाठी भाजपच्या बैठका सुरु आहेत. जुन्या मित्रांना पुन्हा जवळ करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर अजित यांनी भाजपशी हातमिळवणी करणे हा साधा योगायोग नाही. गेल्या वर्षी मार्चमध्ये भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी अजित यांची चर्चा झाली व त्यांनी राष्ट्रवादी सोडणे जवळपास निश्चित झाले होते; पण त्यांनी मुख्यमंत्री पदाचा हट्ट धरला तो भाजपला मान्य नव्हता म्हणून ते थांबले. आता अजित यांना ते पद मिळणार का? राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना होऊन अनेक वर्षे झाली तरी या पक्षाचा मुख्यमंत्री झाला नाही ही खंत अजित यांनी अलीकडे पुन्हा व्यक्त केली होती. त्यांची सत्ताकांक्षा व पदाची अपेक्षा भाजपने नेमकी हेरली. त्यांना आपल्याकडे खेचणे त्या मुळे भाजपला सोपे गेले. भाजपने लोकसभेच्या निवडणुका दोनदा जिंकल्या पण गुजरात वगळता त्यांना स्वबळावर कोणतेही मोठे राज्य जिंकता आलेले नाही. महाराष्ट्र,मध्य प्रदेश, कर्नाटक व गोवा येथे त्यांनी विरोधी पक्षांत फूट पाडून सत्ता मिळवली. मात्र कर्नाटकात त्यांना नुकतीच ती गमवावी लागली. मध्य प्रदेश व राजस्तानात काय घडेल ते आताच सांगता येत नाही. साहजिकच महाराष्ट्रासारखे मोठे राज्य त्यांना गमवायचे नाही, उलट येथे त्यांना आपली बाजू अधिक भक्कम करण्याची गरज आहे. उत्तर प्रदेशा खालोखाल महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्वाधिक ४८ जागा आहेत. दक्षिणेकडील राज्यांत भाजपला स्थान नाही त्यामुळे महाराष्ट्रात जास्तीत जास्त जागा जिंकणे त्यांच्यासाठी क्रमप्राप्त आहे. शिंदे गट व अजित पवार गट यांना आपल्या छत्राखाली घेऊन भाजपने राज्याच्या विविध भागांत आपले स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच प्रमाणे विविध जाती समूहांना आपल्याकडे वळवण्याचाही हा प्रयत्न आहे. महाराष्ट्रात मराठा मतदार सुमारे ३५ टक्के तर इतर मागास वर्गाचे मतदार सुमारे ५० टक्के आहेत. मराठा मतांमुळे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे आमदार वाढले. अजित पवार व छगन भुजबळ यांना सोबत घेतल्यास या दोन्ही वर्गांची मते आपल्याकडे येतील असा भाजपचा होरा आहे. काँग्रेसच्या पारंपरिक मतपेढीत शिरकाव करणे हे भाजपचे उद्दिष्ट आहे. देशाच्या व राज्याच्या राजकारणात सध्या कोणी महत्त्व देत नसले तरी कर्नाटकात स्वबळावर बहुमत मिळवून काँग्रेसने सर्वांना चकित केले; पण सध्या महाराष्ट्राबाबत काँग्रेसने सावध पवित्रा घेतला आहे. शिंदे गटाच्या अपात्रतेचा निर्णय कधी लागेल हे सांगता येत नाही. मात्र संसदेचे पावसाळी अधिवेशन संपल्यावर हा गट अपात्र असल्याचा निकाल विधानसभेचे अध्यक्ष देऊ शकतात त्यामुळे ११ ऑगस्टच्या सुमारास अजित यांना मुख्यमंत्रिपद मिळू शकते असेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.तसे झाल्यास अजित पवार गटाची शक्ती वाढेल. त्यास ज्येष्ठ नेते शरद पवार कसे टक्कर देतील हे पाहावे लागेल. दोन्ही गटांच्या मुंबईतील कथित शक्ती परीक्षेतून खरेतर चित्र स्पष्ट झालेले नाही. सत्ता असते तिकडे जास्त माणसे असतात हा साधा नियम आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत कोण बाजी मारेल त्यावर बरेच काही ठरेल. सध्या भाजपने त्याच निवडणुकीची तयारी म्हणून अजित यांना आपल्या गोटात खेचले आहे. त्याचा परिणाम नंतर दिसेलच.

# कृष्णमनोगत आणि गवसलेला कृष्णस्पर्श!

**कृष्ण शोधायासी निघाले**
**कृष्णातचं पहा हरवूनी गेले**
**कृष्ण काय हे गवसूनी गेले**
**स्वतः कृष्ण होवूनी राहिले**
**कृष्ण मुखातूनी मैत्रेयजी वदले**
**अद्भूत जीवन रहस्यचं उलगडले**
**मैत्रेयत्त्वात अशी हरखूनी गेले**
**कला जगण्याची शिकूनी गेले**

जीवन जगणं ही एक कला आहे. शिवाय ही कला विकसित करण्या साठी फारसे श्रम घ्यावे लागत नाही. जर आपली संवेदनशीलता परिपूर्ण असेल, तर आसमंतात पाहतांना अविरत आनंदाचा अनुभव घेता येऊ शकतो असे कृष्ण सात्यकीला सांगत आहे... मैत्रेयजींनी अशी जीवना विषयक महत्त्वाची सुत्रे कृष्ण मुखातून वदवली आहेत... कृष्ण आपल्याशी बोलतोय, या आविर्भावात कादंबरीची सुरुवात होते, तिथूनच आपणं आणि कृष्ण जोडले जातो... आणि लेखक मात्र स्वतः बाजूला होतो... लेखकाच्या अस्तित्वाची चाहूल कुठेही नकळत ही जाणवत नाही... हे या कादंबरीच्या यशाचे रहस्य आहे.... लेखकाची लेखणीला दाद द्यावी लागेल... आपल्या समोर असतो... तो फक्त कृष्ण! वाचकाला खिळवून ठेवायची किमया, जबरदस्त ताकद त्यांच्या लेखनीत आहे... किंबहुना हे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे...

कादंबरीच्या सुरवातीपासून ते शेवट पर्यंत लेखक आपल्याला कृष्णात गुंतवून ठेवतात...! अध्यात्म हे जीवनाचे अधिष्ठान होते असे नाही तर नकळत पाऊले तिकडे वळलीत आणि अध्यात्म हेचं जीवन होऊन गेलं...ध्यान हे सर्वस्व होऊन गेले... अशा ध्यानाच्या वेडाने झपाटलेल्या या ध्यान योग्याने म्हणजेच स्वामी मैत्रेयजींनी आपल्या अथांग ज्ञान, गहन ध्यान साधनेने निर्माण झालेल्या अंतस्थ दृष्टीने म्हणजेच अंतर चक्षूने पाहिलेल्या आणि कसलेल्या लेखणीने निर्मीत केलेल्या या कृष्णमनोगता बद्दल बोलणं ही एक परिक्षाचं ठरेल... कारण कृष्णा सारख्या मुळात गुढ अनाकलनीय सहस्त्र कलागुणांनी अवगत असलेल्या अशा जबरदस्त ताकदीच्या व्यक्तीला शब्दांत उतरवणं... ते ही मैत्रेयजीं सारख्या व्यक्तीने... आणि यावर आपण भाष्य करण म्हणजे सुर्यापुढे काजवा चमकण्या सारखेच आहे... आजवर आपणं कृष्णाबद्दल कित्येक पुस्तक वाचलीत... कैक वर्षे झालीत आपणं वाचत आहोत... बोलत आहोत... पण कृष्ण आजतागायत आपल्याला कळलेला नाही... तो कृष्ण त्यांनी इतका लिलया आपल्या भोवती ऊभा केला आहे... तो आपल्या समोर वावरतो... सारं सारं समोर घडतं असल्याचा भास होतो... या ध्यान योग्याने आपल्या लिखाणातून कृष्णा करवी जागोजागी ध्यानाच्या साधनेची सुत्रे सहजपणे सोडलेली आहेत... ईतकी लिलया ती आपल्या अंतरंगी झिरपवली आहेत... त्यांची ही धडपड वाखाणण्याजोगी आहे... यात कुठेही कुत्रिमता नाही... कमालीची सहजता आहे... आणि ती ईतकी योगायोगाने आणि ओघाने आलेली आहेत... आश्चर्य वाटल्या वाचून राहत नाही...

या कृष्ण मनोगताचे वैशिष्ट्य असे की येथे फक्त कृष्णालाच मोठे केले आहे असे नाही. तर प्रत्येक व्यक्ति रेखेला न्याय दिला गेला आहे ! अर्जून जितका प्रिय तितकाचं कर्णाप्रती तितकीचं प्रिती होती...कर्णाबद्दल व्यक्त होताना कृष्ण म्हणत आहे. मृत्यूच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्याच्या ओठांवर तक्रारीचा सूर नव्हता. सूर्य पुत्रास शोभेल असं स्वच्छ आणि उजळ, निर्मळ मनानं तो जीवन जगला. कृष्णाने डाव उजवं केले नाही

महाभारतात घडून गेलेल्या घटना, व्यक्ती , प्रसंग अगदी बारकाईनीशी चोखंदळपणे हाताळल्या गेल्या आहेत.. लेखकाच्या नजरेतून कुठलीही गोष्ट सुटलेली नाही आहे... वाचकापुढे ते प्रसंग ऊभे करताना लेखकाच्या लेखन शैलीचे दर्शन तर घडतेचं तसेचं बुद्धी चातुर्याचे ही कौशल्य नजरेतून निसटत नाही. लेखकाने समाजाकडून अस्तित्वा कडून जे काही आत्मसात केले आहे ते भरभरुन परत समाजाला देऊ ही केले आहे..


कृष्ण म्हणजे साक्षात परमात्मा ! या परमात्म्याची आपल्याशी गाठ घालून देताना, कुठलाही देखावा नाही.. दिखाऊपणा नाही... किंवा जड शब्दांची भुलावण नाही... तो सम्राट होता.. त्याचे सम्राटपण दाखवताना ही कुठल्याही भरजरी शब्दांची झालर नाही... इतक्या गोपीका, राधा, एवढ्या सार्या राण्या... या सार्यांचा लवाजमा, हे सारे काही दाखवताना कुठेही दिखाऊपणा, बडेजावकीचा लवलेशही नाही... विलक्षण हळवेपणा, तरलता, सहजता, सुंदरता, नितांत प्रेम, रसिकता, प्रत्येक ठिकाणी सहज स्विकृती... सारे सारे अगदी प्रांजळपणे सादर केले गेले आहे...

माता-पिता बंदिवासात असताना मथुरेच्या कारागृहात जन्मलेला हा कृष्ण मात्र स्वतः जन्मापासूनच कायम स्वतंत्रपणे जगला... स्वेच्छेने, आनंदाने मनमुरादपणे जगला... इतकंच कशाला सहवासात येणार्या प्रत्येकाची स्वतंत्रता अबाधित ठेवली... कधीच कुठले निर्णय स्वतः त्याने दुसर्यावर लादले नाहीत... पुढे ऊद्भवणार्या समस्यांची तमा न बाळगता येणार्या परिणामास सहज सामोरे जाणारा कृष्ण.... उदा महाभारताचे युद्ध, जे होऊच नये असे वाटत असतानाही दुर्योधनाच्या निर्णाया आड आला नाही... अर्जुनाला युद्ध करायचे नव्हते गीता सांगून परावृत्त केले... युद्ध कर अशीआज्ञा नाही केली... स्वतःचा निर्णय नाही थोपवला... कृष्णाच्या अनेकविध छटा स्वामीजींनी हळूवारपणे सहजपणे उलगडल्या आहेत... त्या योगे अनेक उत्तमोत्तम जीवन मंत्रे अनेक रहस्ये त्यांनी लिलया ऊलगडवली आहेत.



शब्दांकन
विजया जक्कल
मो.८०१०९५७२७०

तसं पाहिलं तर कादंबरीतील पानं अन् पानचं नव्हे तर वाक्य नी वाक्य... शब्दन शब्द महत्त्वाचा आहे... साध्या साध्या शब्दात, छोट्या छोट्या वाक्यात लाख मोलाचा अर्थ दडलेला आहे...सार्यांचा ऊहापोह करता येणं शक्यचं नाही... काही काही घटनांचा, विधानांचा उल्लेख करावासा वाटतो. बलराम आणि कृष्ण यांच्या संभाषणातून




मैत्रेयजींनी अनेकोनेक गहन गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे... नेमकं कुठल्या गोष्टीचा उल्लेख करावा तेच कळत नाही..पण हे सार अद्भूत अनाकलनीय असेचं आहे...

एके ठिकाणी कृष्ण बलरामास म्हणत आहे, प्रश्न असे असायला हवेत ज्याच्या उत्तराच्या शोधात मनुष्य बदलून गेला पाहिजे आणि शक्यतो आपल्या प्रश्नाचं उत्तर आपणच शोधलेलं बर असतं...दुसर्यांची तयार, ऊधार उत्तर स्वीकारण्यापेक्षा आपल्या प्रश्नाच्या ऊत्तराचा शोध आपणच घेतला पाहिजे. आनंदाची (आनंद वृत्ती) व्याख्या करताना कृष्ण म्हणतो, आपल्या आनंदाचे मूळ स्रोत आपल्या आत मध्येच आहे आणि व्यक्ती, घटना, परिस्थिती हे केवळ निमित्तमात्र आहेत. आनंद खरचं सहज, सरळ, क्षणाक्षणात विखुरला आहे. बोलताना आपल्या प्रत्येक शब्दामागं जागरुकता असली पाहिजे..असं झालं तर आपला कंठ ईश्वराचाच कंठ होऊन जाईल आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे भय आपल्या मनातून विसर्जित व्हायला पाहिजे सात्यकीला समजवताना कृष्ण म्हणत आहे, आपल्या प्रयत्नात सातत्य नसेल, तर आपल्या प्रतिभेला गंज लागायला वेळ लागत नाही. दुसरा तुमच्यावर प्रेम करो ना करो, तुम्ही प्रत्येकाप्रती प्रेमपूर्ण असणं हाच खरा आनंद आहे. ही व अशी विधाने ठायी ठायी आढळतात...

ही जीवनाची सूत्रे नव्हे तर आणखीन काय हो? अगदी सहजपणे कळत नकळत जीवनमंत्रे कानी फुंकली आहेत असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही...! जीवन सर्वार्थाने समृध्द होण्यासाठी, यशस्वी जीवनाची गुरुकिल्लीचं स्वामी मैत्रेयजींनी आपल्याला सोपवली आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

उद्धवाशी संवाद साधताना जीवनातील महत्त्वाच्या घडामोडींवर ऊहापोह केला गेला आहे.. त्यावेळी एकेठिकाणी कृष्ण म्हणत आहे, मनुष्य आस्तिक आहे किंवा नाही या पेक्षा तो जीवनाचा स्वीकार आणि सन्मान करणारा आहे की, नाही हे जास्त महत्त्वपूर्ण असतं. आनंद विषयी कथन करताना कृष्ण म्हणत आहे जेव्हा तू साक्षी भावनेत स्थिर होशील आणि अनुभव घेणार्या चैतन्याला जाणशील तेव्हा तू कधी न आटणार्या आनंदाच्या महासागरात स्थिर होशील..! अडचणी आणि समस्या आव्हान समजून स्वीकारल्या पाहिजेत ! कृष्ण मुखातून स्वामीजींनी अशी अनेक ध्यानाची सुत्रे, जीवन रहस्ये सहजतेने ऊलगडवली आहेतं! ही कादंबरी म्हणजे केवळ वाचकाचे मनोरंजन हा एकचं हेतू ठेवून लेखकाने कृष्ण आपल्या समोर ऊभा केला नाही आहे तर जीवन जगणं ही एक कला आहे... त्या कलेशी त्यांनी आपल्याला परिचित केले आहे.. मैत्रेयजींनी साकार केलेला हा कृष्ण वाचकाचा मित्र होऊन जातो.. प्रसन्नता, आनंद हे बाहेरून मिळतं नाही. त्यांचं अस्तित्व आपल्या आतचं असतं अशी अनेक उत्तमोत्तम सुत्रे मैत्रेयजींनी जागोजागी कृष्ण मुखातून वदवली आहेत. आणखीन एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो...


आनंद, अहंकार, स्वपरिचय या व अश्या अन्य बर्याचं गोष्टी बद्दल कृष्ण मुखा करवी चर्चेद्वारे अनेक साधेसुधे वाटणारे पण तितकेचं महत्त्वाचे असणारे विषय हाताळले गेले आहेत. जसे की, अंधकार ! ईतर कुठल्याही कृष्ण चरित्रात अंधकाराची वाच्यता झाल्याचे माझ्या तरी वाचण्यात नाही. अंधाराला कोणी स्पर्श केल्याचे पाहण्यात नाही... मैत्रेयजींनी मात्र अंधाराचा आधार घेऊन कैक गोष्टींवर प्रकाश टाकला आहे.. हे सारं स्तिमीत करणारं आहे.

कृष्ण उद्धवास म्हणतं आहे की, जे आपलं नाही तेचं फक्त अंधकार हिरावून घेतो, त्यामुळे जे आपलंच आहे ते अधिक स्पष्टपणे प्रकट होतं. अंधकार अशी एक पाऊलं वाट आहे, जी आपल्याला समाधानाच्या अति उच्च शिखरावर घेऊन जाते. अंधारात लिन होण्या सारखा दुसरा आनंद नाही. वगैरे.. वगैरे.... इतक्यावर कृष्ण (मैत्रेयजी) थांबत नाहीत... तर अंधकारावर त्यांनी इतकं भाष्य केलेलं आहे थोडक्यात त्याचा ऊहापोह करता येणं शक्यच नाही....

वाचताना भले ही साधे सोपे असे वाटतं असले तरी ही त्यात किती गहन तत्वज्ञान दडलेलं आहे हे जाणकारच जाणे, असे ही आपणं म्हणू शकत नाही, कारण एखादा अनभिज्ञ, असमंजस अजाणं व्यक्ती देखील त्या विधानातील गर्भितार्थ समजू शकेल... एखाद्या लहान विद्यार्थ्यांने जरी वाचायला घेतले तरी त्यालाही सहज ऊमजेल, रुची वाटेल, असेचं आहे... हे पुस्तक केवळ वाचकांच्या मनाची पकड घेत असे नाही तर वाचकाला खिळवून ठेवते... नकळतपणे जीवन रुपांतरणास कारणीभूत ठरते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही... सध्याच्या युगात वाचकाला कादंबरीत खिळवून ठेवण्यासाठी जे काही लागतं.... त्या गोष्टींचा विचार न करता... जे काही स्वतः जवळ आहे ते मुक्त हस्ते, जितकं म्हणून देता येईल तितकं देण्याचा प्रामाणिक प्रयत्न मैत्रेयजींनी केलेला आहे...

(क्रमशः)

## शब्दकोडे-११४



आडवे शब्द

१. बिकट ६. आजपर्यंत १०. डाळीचे कालवण ११. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास १५. दोन्ही हातांच्या बोटांची संख्या १६. धातूची तार काढणारा १७. अडत्या १९. वस्त्र, कापड २२. संताप, चीड २५. एक ज्वालाग्राही पदार्थ २६. तत्काळ चपखल उत्तर देणारा २७. सरसरीत २९. काळ्या तोंडाचे मोठे माकड ३०. वारा, वायू, हवा ३१. सारखा, तुल्य ३२. भारतीय सैनिक ३३. घोड्याला बांधण्याची जागा ३४. फट, खड्डा ३६. तोफगाडी ३७. वाईट सवयी असलेला ३८. बालीशपणा ४१. आई ४२. गरीब ४३. वाळवंट ४५. एक शेंगभाजी ४७. गुलबक्षी रंगाचा हिच्याशी काय संबंध? ४८. सोन्या चांदीचा व्यापारी ४९. शिव्याशाप ५०. श्रीमान, श्रीयुत ५२. चुरूचुरू ५३. चक्र ५५. आटोपणे, साफसफाई करणे ५७. उलटी, ओकारी ६०. वितरण ६२. केसांची बट ६३. धमनी ६४. कायदेशीर ६६. लत्ताप्रहार ६७. छळ ६८. अहंकार ६९. पाणकोंबडा ७१. आठवण ७२. गुणाकार ७३. मध्यम प्रमाण ७४. फुलांचा वाफा ७५. वृत्तपत्र ७७. कुंपण ७८. जम ७९. चक्षु, डोळे ८०. देवाला घातले जाणारे 'संकट'

उभे शब्द

१. इंद्रिय २. आशीर्वाद ३. मोठा हातोडा ४. संध्याकाळ ५. पोट ६. सगळ्यात महत्त्वाचा दिवस ७. त्वरित ८. बेसावध ९. मनाची घालमेल, तडफड ११. राजाचे संबोधन १२. वेल १३. दागदागिने १४. चामखीळ १८. मिंधा २०. सोशिकपणा २१. दृष्टी, टक २३. गाठोडे २४. सुस्ती, कंटाळा २५. राजमहाल २८. युद्ध ३०. लिहिलेले वाचणारा ३२. इतरांपेक्षा निराळा ३३. अत्यंत तहान लागणे ३४. लोणच्यातील द्रव ३५. चिक्कू मनुष्य ३७. लग्न न झालेली ३८. मूल ३९. शेंगेवरील आवरण ४०. चंद्राची कड ४४. कपाळभर लावलेले कुंकू ४६. मार्गक्रमण ४७. मीठ ४९. समशेर ५१. मुसलमान ५४. बडबड, त्रास ५६. गुरांना गावाबाहेर कुरणात चरण्याबद्दल द्यावे लागणारे द्रव्य ५८. माज ५९. सुदैवी ६१. पळून जाणे ६४. संपूर्ण ६५. दात ६७. संथ गतीने चालणारा प्राणी ६८. 'श्रीमंत'च्या विरुद्ध ७०. गीत, गाणे ७१. सारखा ७२. छापील निवेदन ७४. आलाप, लकेर ७६. अर्धी ओंजळ

### शब्दकोडे ११३ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.व्यवसाय ५.पदरमोड ९.पाडवा ११.दामोदर १४.दरसाल १६.साहस १८.कारण १९.बालक २०.धवल २२.मातकट २४.वरवर २५.मन २६.वन २८.टणक २९.अवदसा ३०.कटी ३१.सुधा ३४.सामना ३५.नमस्कार ३६.माड ३७.रचनाकार ३८.वय ४०.नसता ४२.मोर ४४.दमामा ४६.सरदार ४८.खल ४९.नंदलाल ५०.कस ५२.रणगाडा ५४.पार्वती ५५.लकवा ५७.महामानव ५९.खोड ६०.विना ६२.कोठार ६५.सव्वाशेर ६६.नाचा ६७.रया ६९.मधुकर ७०.हमाल ७१.तातडी ७३.सीता ७४.कुडी ७६.नारद ७८.राजकारण ८०.जाणता राजा ८१.भू ८२.मलम ८३.रसबाळी

**उभे उत्तर**

२.वसाहत ३.यदा ४.पदरव ६.दरबार ७.मोदक ८.डर ९.पालव १०.वाचा १२.मोका १३.रणरण १५.साधनसामग्री १६.सामनसुमान १७.सकट २१.लवकर २३.टणत्कार २५.मदन २७.नटी २९.अनावर ३२.धाडस ३३.विनाकारण ३४.सार ३९.सीमा ४१.तास ४२.मोल ४३.विनंती विशेष ४४.दलाल ४५.मालक ४७.दारवठा ४८.खडा ५०.कमतरता ५१.सहा ५३.गाज ५४.पाडस ५६.वाटचाल ५८.नकोसा ६१.नार ६३.रमताराम ६४.नकलाकार ६६.नामानिराळा ६८.यातना ७२.डीर ७४.कुणबा ७५.सणक ७७.दम ७९.रस

## वाढदिवसाचे अध्यात्मिक प्रयोजन

**- संत राजिन्दर सिंह जी महाराज**

आपला खरा वाढदिवस साजरा करण्यासाठी आपण आपला दिवस कसा घालवायचा? जेणेकरुन आपले जीवन उत्सवा सारखे साजरे करण्याजोगे झाले पाहीजे. आपण प्रत्येक दिवस कृतज्ञतेच्या भावनेने जगले पाहिजे, ज्यासाठी आपल्याला हे मानवी शरीर मिळाले आहे. आपले हे मानवी शरीर आपल्याला कायमचे मिळणार नाही, म्हणून आपण त्याला कायमस्वरूपी समजू नये. जीवनाच्या इतर कोणत्याही योनीमध्ये आपल्याला सारखी क्षमता दिली नाही ज्यामध्ये आपण स्वतःला ओळखू शकू आणि प्रभु-परमेश्वराला प्राप्त करू शकू. जेव्हा आपण आपले जीवन मानवी रूपात जगतो तेव्हा आपल्याला हे लक्षात घेतले पाहिजे की आता आपली प्रभु-परमेश्वराला भेटण्याची पाळी आली आहे. काय, या संधीचा आपण चांगला उपयोग करावा कि गमवावा?



प्रभु-परमेश्वराने आपल्याला हे शरीर फक्त अध्यात्मिक संपत्ती मिळविण्यासाठी दीले आहे हीच अध्यात्मिक संपत्ती आपल्याला परत प्रभु-परमेश्वराकडे घेऊन जाईल. आपण काय करतो? आपण इतर प्रजातीं प्रमाणे आपल्या जीवनाचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत राहतो. बहुतेक लोक या संपूर्ण मानवी जीवनाच्या देणगीचा वापर फक्त ते खाण्यासाठी, मुले मुलांना जन्मदेण्यासाठी आणि निरोगी ठेवण्यासाठी करतात. आपण हे समजून घेतले पाहिजे की आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण मौल्यवान आहे. म्हणून आपण आपल्या या श्वासांचा उपयोग आत्मज्ञान मिळविण्यासाठी आणि प्रभु-परमेश्वराचा साक्षात्कार करून घेण्यासाठी केला पाहिजे, ज्यासाठी आपल्याला हे मानवी शरीर दिले आहे. जेव्हा आपला संपर्क प्रभु-परमेश्वराच्या ज्योतिशी होईल तेव्हा आपल्यासाठी पहाट होईल आणि आपण त्या प्रभु-परमेश्वराच्या दिव्य-ज्योतिच्या स्त्रोताचे कधीही अमृत पिऊ शकतो. हा उत्सवाचा काळ आहे ज्यामध्ये आपण आंतरिक मंडाळांचा अनुभव घेऊ शकतो. आपल्याकडे ध्यान-अभ्यासाची एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे आपण आपल्या अंतरी आपल्याला पाहिजे तेव्हा जाऊ शकतो. आता हे आपल्यावर अवलंबून आहे की आपण ध्यान अभ्यासात वेळ देऊन आपल्या मौल्यवान भेटीचा उपयोग करतो की नाही? चला तर, आपल्या जीवनातील प्रत्येक दिवस हा जन्म दिवस समजून परम पिता परमेश्वराचे आभार मानूया आणि ध्यान-अभ्यासाकरिता वेळ देऊया, तरच आपण खरा वाढदिवस साजरा करू शकू.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

प्रोसेस जमा ॲड.झेड.आर.अन्सारी
निशाणी नं.२२

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र. ८०/२०२३**

राईसा नाज शरीफ खाटीक, वगैरे २ ............अर्जदार
वि.
कोणीही नाही .............जाबदेणार
शरीफ अकबर खाटीक .............(मयत)

ज्याअर्थी दि.१२/०१/२०१३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ हे मयत शरीफ अकबर खाटीक यांचे कायदेशीर वारस आहेत. यासंदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट)मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरिता चौकशी तारीख १०/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. क्रमांक ७. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे.न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दी दिली असे.

धुळे
दिनांक-०४/०७/२०२३ आदेशावरुनक

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश व . स्तर, धुळे**

---

ॲड.संदीप अर्जुन गर्दे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र. ७९७/२०२३**

१. नवल जयसिंग मोरे (भिल) वगैरे. ......अर्जदार
वि.
निरंक ........जाबदेणार
रखमाबाई जयसिंग मोरे (भिल) ........मयत
रा.अनकवाडी ता.जि.धुळे

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ४. सो. धुळे यांचेकडे दि.१/७/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि. दि. अर्ज क्र.७९७/२०२३ चा अर्ज रुखमाबाई जयसिंग मोरे (भिल) यांचे कायदेशीर वारस आहेत अर्जदार यांना यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. १९/८/२०२३ हि निश्चि केली आहे. त्याअर्थी तमास जनतेस हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोर्ट नं. ४ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी में, कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण: धुळे
०५/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**

---

प्रोसेस जमा ॲड.सौ.अरुणा डी.महाजन
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र. ७२२/२०२३**

श्री.सुभाष ओंकार चौधरी (माळी) व इतर .........अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही .............सामनेवाला
कै.धृपदाबाई (द्रोपदाबाई) भ्र.ओंकार चौधरी माळी ..(मयत)
(मृत्यू दि.२७/०९/२०२२)
मृत्यू समयीचा पत्ता: रा.धुळे ता.जि.धुळे
कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी
(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. धृपदाबाई (द्रोपदाबाई) भ्र. ओंकार चौधरी (माळी) यांचे कायदेशिर वारस ठरवून मिळणेकामी अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश साो. क.स्तर कोर्ट नं. ८ यांचे कोर्टात दिनांक १८/०८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. धृपदाबाई (द्रोपदाबाई) भ्र. ओंकार चौधरी(माळी) यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि.०३/०७/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश क . स्तर, धुळे**

---

# लासलगाव बाजार समितीत कांद्याची मोठी आवक

**लासलगाव ।** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारावर सोमवारी २ हजार ३५ वाहनांमधून सर्वाधिक ३७ हजार ५५० क्विंटल उन्हाळ कांद्याची आवक झाली. बाजारभाव कमीत कमी ७००, जास्तीत जास्त २६५१ व सर्वसाधारण १४६० रुपये प्रती क्विंटल होते, अशी माहिती बाजार समिती सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी दिली. चालू वर्षात कांद्याची विक्रमी आवक झाली. कांदा लिलाव बंद असल्याने येथील बाजार समितीत कांदा विक्रीसाठी शेतकरी बांधवांनी एकच गर्दी केली होती.

---

ॲड.टी.एस.अमृतसागर
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र. ७४४/२०२३**

१. हिरकनबाई सुरेश पाटील
उ.व.७१ वर्ष, धंदा-घरकाम
२. प्रविण सुरेश पाटील
उ.व.४२ वर्ष, धंदा-हातमजुरी
३. प्रकाश सुरेश पाटील
उ.व.४९ वर्ष. धंदा - हातमजुरी
४. संगिता संजय पाटील
उ.व.४३ वर्ष, धंदा- घरकाम
५. अलकाबाई दिलीप पाटील
उ.व.४४ वर्ष. धंदा - घरकाम
नं.१ ते ५ रा.फागणे ता.जि.धुळे ............अर्जदार
वि.
कोणीही नाही .............सामनेवाला
आणि
सुरेश विष्णु पाटील (मयत) मृत्यू ठिकाण : फागणे ता.जि.धुळे

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात सुरेश विष्णु पाटील (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ५ हे कायदेशीर वारस असून वारस दाखला हा शासकीय-विमशासकीय कामासाठी तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. २३/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.१७/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश साो. क.स्तर कोर्ट नं. ५. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०३/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश व . स्तर, धुळे**

---

प्रोसेस जमा ॲड. नितीन एन. चोरडीया
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर) साो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ६९१/२०२३**

१) जगदिश प्रकाश सोनवणे
उ.व. ३५ वर्षे, धंदा- खाजगी
रा. घर नं. ११६२, गल्ली नं. ९,
खुनी मस्जीद जवळ, सुभाष नगर, जुने धुळे, ता. जि. धुळे
२) गिता शशिकांत अहिरराव
उ.व. ४३ वर्षे, धंदा- घरकाम रा. विवेकानंद नगर, नांदगाव, ता. मनमाड, जि. नाशिक
३) सविता सुनिल सोनार
उ.व. ४१ वर्षे, धंदा- घरकाम
रा. श्री वरद को.ऑप. हौ. सोसायटी, रामबाग,
गल्ली नं. ४, कल्याण, जि. ठाणे
४) कविता संदिप विसपुते
उ.व. ३६ वर्षे, धंदा- घरकाम
रा. गोदावरी नगर, म्हाडा कॉलनी,
दत्त मंदिर जवळ, चुंचाळे शिवार, नाशिक .....अर्जदार
वि.
कुणीही नाही ....सामनेवाला
शोभा प्रकाश सोनार
मृत्युदि. १६/११/२०२१
मृत्यु ठिकाण: धुळे, ता. जि. धुळे .....(मयत)
भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारसा दाखला मिळणे करीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी मयत कै. शोभा प्रकाश सोनार यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि.अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश साो. (क) स्तर) कोर्ट नं. ९ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौ. ता. दि. १७/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (व स्तर) कोर्ट नं. ९ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वत: किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे.न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाचीही, काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. शोभा प्रकाश सोनार यांचे कायदेशिर वारस म्हणुन भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखला देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयांचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. ०३/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे** **दिवाणी न्यायालय, धुळे**

---

# विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

**नाशिक । प्रतिनिधी**

कोल्हेर येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभागाकडून दोन तासांच्या प्रयत्नाने बिबट्याला बाहेर काढण्यात यश आले. दिंडोरी तालुक्यातील कोल्हेर शिवारात विहिरीत जयराम गवळी यांच्या विहिरीत बिबट्या पडला असल्याचे आढळून आले.

येथील ग्रामस्थांनी वनविभागाला याची माहिती कळवली. वन विभागाकडून बिबट्यास बाहेर काढण्यासाठी पिंजरा लावण्यात आला. दिंडोरी तालुक्याच्या वनपरिक्षेत्र अधिकारी पूजा जोशी घटनास्थळी दाखल झाल्या. विहिरीत बिबट्या असल्याची माहिती समजताच ग्रामस्थांनी या ठिकाणी गर्दी केली होती. विहीर जवळपास पन्नास फुटापेक्षा जास्त खोल आहे. विहिरीच्या कपारीत बसलेला बिबट्या दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास पिंजर्यात आल्यानंतर वरती काढण्यात आले व त्याला वनविभागाच्या कर्मचार्यांनी नाशिक येथे पाठवून दिले. यावेळी रामचंद्र तुंगार, रूपाली देवरे, राऊत, अशोक काळे, अण्णा टेकनर, शिवाजी शार्दूल आदी कर्मचारी उपस्थित होते. भक्ष्याच्या शोधात बिबट्या आला असावा. गावाला लागून काही डोंगराळ भाग, काही जंगलाचा भाग असल्यामुळे बिबट्या या पट्ट्यात दिसून येतात.

---

ॲड.संदीप अर्जुन गर्दे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र. ७९६/२०२३**

१. सिंधुबाई रतन पाटील वगैरे. ......अर्जदार
वि.
निरंक ........जाबदेणार
कै.रतन भोजू पाटील ........मयत

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. २ सो. धुळे यांचेकडे दि. १/७/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि.दि.अर्ज क्र.७९६/२०२३ चा अर्ज कै. रतन भोजू पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.१४/०८/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कोर्ट नं. २ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण: धुळे
०४/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**

---

प्रोसेस जमा ॲड. शशिकांत पाटील
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ७९०/२०२३**

१) नाना विनायक पाटील
उ. वय.:- ६५, वर्ष, कामधंदा, शेती
२) कैलास विनायक पाटील
वय.:- ५२, वर्ष, कामधंदा, शेती
३) प्रल्हाद विनायक पाटील उ. वय.:- ४७, वर्ष, कामधंदा, शेती अर्जदार क्र १ ते ३ रा. नगाव ता जि धुळे
४) निलाबाई दिनकर पाटील
उ. वय.:-६८, वर्ष, कामधंदा, घरकाम
रा. दडेगाव ता एरंडोल जि जळगाव
५) सुंनदाबाई गंगाराम पाटील
उ. वय.:-६८, वर्ष, कामधंदा, घरकाम
रा. लक्ष्मी नगर सुरत ता जि सुरत गुजरात राज्य
६) शोभबाई अरूण पाटील
उ. वय.:-५६, वर्ष, कामधंदा, घरकाम
रा.मुडी बोदडे ता जि धुळे ...अर्जदार
वि.
कै. विनायक सोनु पाटील (मयत)
मृत्यु दिनांक १३/६/२००८
मुत्यृ ठिकाण- नगाव ता. जि. धुळे .....सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. ५ वे सह दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. ३०/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ७९०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. विनायक सोनु पाटील (मयत) याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ६ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.२१/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ५, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०५/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.** **दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**

---

प्रोसेस पेड ॲड.राकेश अशोक मोरे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे. चिफ ज्युडि. मॅजि. साहेब यांचे कोर्टात**

**फौ. कि. अर्ज नं. ५४९/२०२३**

श्री. शरद हरचंद चौधरी,
उ.वय. ५३ वर्ष, धंदा : खाजगी नोकरी,
रा. मु. पो, चिंचवार, ता. जि. धुळे.
ह.मु. ४७, शिवकृपा सोसायटी, राम नगर
समोर, निलगीरी, सुरत सिटी, गुजरात राज्य, ....अर्जदार
विरूध्द
म. निबंधक साो.
जन्म-मृत्यु, विवाह नोंदणी अधिकारी
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवार, ता. जि. धुळे. ....सामनेवाला

जन्म व मृत्यु, विवाह नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये (जन्म दाखल मिळण्यासाठी)

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी त्यांचे जन्माची नोंद मौजे चिंचवार ता. जि. धुळे येथील ग्रामपंचायत दप्तरी होवुन मिळणेसाठी तसा मे. न्यायालयाचा आदेश मिळणेकामी जन्म व मृत्यु, विवाह नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालय कोर्ट नं. ०६ यांचे कोर्टात दिनांक ९/८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना त्यांचे जन्माची नोंद मौजे चिंचवार ता. जि. धुळे येथील ग्रामपंचायत दप्तरी होवुन मिळणेसाठी तसा मे. न्यायालयाचा आदेश मिळणेकामी जन्म व मृत्यु, विवाह नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ३/७ / २०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो.धुळे** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. धुळे**

---

प्रोसेस जमा ॲड.गोंविंद बी.साखरे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज नं . ७८१/२०२३**

१) नथाबाई दशरथ पाटील
उ.व. ७८ वर्षे, धंदा- घरकाम
रा. रोशन नगर, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे
२) आप्पा दशरथ खैरनार (पाटील)
उ.व. ४५ वर्षे, धंदा- नोकरी
रा. तीखी रोड, क्रांती चौक,
मोहाडी, ता.जि. धुळे
३) दिपक दशरथ खैरनार (पाटील)
उ.व. ४० वर्षे, धंदा- मजुरी
रा. रोशन नगर, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे
४) सुनंदा भगवान पाटील
३.व. ६१ वर्षे, धंदा- घरकाम
रा. १५३-४, अरूण नगर, चोपडा,
ता. चोपडा, जि. जळगाव
५) लताबाई कैलास पाटील
उ. व. ५६ वर्षे, धंदा- घरकाम
रा. मु.पो. देवगाव, ता. पारोळा, जि. जळगाव
६) मिठाबाई दाजिबा पाटील
उ.व. ५३ वर्षे, धंदा- घरकाम
रा. मु.पो. देवगाव, ता. पारोळा, जि. जळगाव
७) रेखाबाई छोटु पाटील
उ.व. ५२ वर्षे, धंदा- घरकाम
रा. तीखी रोड, उपनगर,
मोहाडी, ता.जि. धुळे
८) कल्पना विजय पाटील
उ.व. ४६ वर्षे, धंदा- घरकाम
रा. मु.पो. टोळी, ता. पारोळा, जि. जळगाव ..........अर्जदार
वि.
कुणीही नाही ......सामनेवाला
कै. दशरथ दोधा पाटील .......(मयत)
मृत्यु दि. १३/१०/२००३
मृत्युचे ठिकाण: मोहाडी उपनगर, धुळे
बॉम्बे रेग्युलेशन कायदा VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे
वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ८ यांनी, कै. दशरथ दोधा पाटील यांचे कायदेशिर वारस रेग्युलेशन ॲक्ट कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो.(क. स्तर) कोर्ट नं. ५ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ.ता.दि. १९/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो.(क.स्तर) कोर्ट नं.५ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून सदस्कामी आपले म्हणणे, हरकत तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काही एक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. दशरथ दोधा पाटील यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला Legal Heirship Certificate देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काही एक हरकत ऐकून घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. ०३/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे** **दिवाणी न्यायालय, धुळे**

# धुळे शहर लवकरच येणार सीसीटीव्हीच्या निगराणीखाली

### जिल्ह्यातील सहा तिर्थक्षेत्र क वर्ग म्हणून घोषित

### जिल्ह्याला लवकरच मिळणार २०० ट्रान्सफार्मर

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे शहरातील दैनंदिन घडमोंडीवर लक्ष ठेवणे तसेच कायदा व सुव्यवस्था अधिक चांगल्या पध्दतीने राखण्यासाठी शहरातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यास मंजूरी, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी मुबलक विनाअडथळा वीज उपलब्ध व्हावी, याकरीता २०० ट्रान्सफार्मर खरेदीची कार्यवाही लवकरात लवकर करणे, त्याचबरोबर जिल्ह्यात पर्यटन वाढीस लागावे याकरीता जिल्ह्यातील सहा तिर्थक्षेत्र क वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्याबरोबरच जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या बांधण्याचा प्रस्ताव सादर तातडीने सादर करण्याच्या सुचना राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गिरीष महाजन यांनी आज दिल्यात.

जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री ना. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे पार पडली, यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती अश्विनी पवार, आमदार किशोर दराडे, आमदार काशिराम पावरा, आमदार कुणाल पाटील, आमदार श्रीमती मंजुळाताई गावीत, महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. जानगर यांच्यासह लोकप्रतिनिधी, नियोजन समितीचे सदस्य, सर्व विभागप्रमुख ऑनलाईन उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. महाजन पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे याकरीता त्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, याकरीता मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांचे एक महिन्याच्या आत सर्व्हेक्षण करा, त्या खोल्या निर्लेखित करुन नवीन वर्ग खोल्या बांधण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, प्रत्येक शाळेमध्ये स्वच्छतागृह व पिण्याचे पाण्याच्या व्यवस्था करण्याची सुचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्यात. धुळे शहराला अक्कलपाडा योजनेने पाणीपुरवठा होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, धुळे शहरातील घडामोंडीवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी शहरातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याच्या २ कोटी ६९ लाख रुपयांच्या खर्चास आजच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. तसेच जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील अमोदे येथील श्री गजानन महाराज मंदिर, सावळदे येथील श्री महादेव मंदिर, शिंदखेडा तालुक्यातील दभाषि येथील श्री. शनिदेव मंदिर, कर्ले येथील श्री धनदाई माता मंदिर, सुराय येथील श्री. विठ्ठल मंदिर आणि साक्री तालुक्यातील आयने येथील श्री. महादेव मंदिर या तिर्थक्षेत्रांना क वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यास आजच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. शिवाय जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी मुबलक विनाअडथळा वीज उपलब्ध व्हावी, याकरीता २०० ट्रान्सफार्मर जिल्हा नियोजन समितीच्या खर्चातून खरेदी करण्यास यापूर्वीची मंजूरी देण्यात आली आहे. ही खरेदीची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याची सूचनाही पालकमंत्र्यांनी बैठकीत दिली.

खरीप हंगामास सुरुवात झाली असून शेतकऱ्यांना बी-बीयाणे व खतांची कमतरता भारसणार नाही याची दक्षता घ्यावी, बोगस बियाणे विक्रीवर आळा घालावा, बोगस बियाणे विक्री आढळल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करावे, जलजीवन मिशनच्या कामांना गती देण्याची सुचनाही त्यांनी केली. या बैठकीत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती पवार यांनी जिल्हा परिषदेस तर महापौर यांनी महानगरपालिकेस निधी वाढवून मिळावा, आमदार श्री. दराडे यांनी जिल्ह्यातील शाळेच्या वर्ग खोल्यांचा प्रश्न मांडला, आमदार कुणाल पाटील यांनी ट्रान्सफार्मर खरेदी, आमदार श्रीमती गावीत यांनी साक्री तालुक्यातील नवनिर्मित ग्रामपंचायतीसाठी कार्यालये बांधणे, आमदार श्री. पावरा यांनी शिरपुर तालुक्यातील बंधाऱ्यांची दुरुस्ती तसेच रस्त्यांचा प्रश्न मांडला. तसेच इतर सदस्यांनीही उपयुक्त सुचना केल्यात.

बैठकीच्या प्रास्ताविकात जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी जिल्हा विकास आराखडा तयारीबाबत सांगितले तसेच सन २०२२-२३ मध्ये झालेल्या खर्चाची तसेच सन २०२३-२४ मध्ये उपलब्ध निधी, वितरीत केलेला व खर्च झालेलया निधीची माहिती दिली. तसेच विहित कालावधीत मंजूर कामे पूर्ण करणे व निधी खर्चाचे नियोजन करण्यात आल्याचे सांगितले. जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती हटकर यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखविले. तसेच आतापर्यंत प्राप्त निधी व खर्चाची माहिती दिली.

## न्यूज कॉलम

### जितेंद्र कापडीस यांचे सेट परीक्षेत यश

**धुळे ।** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सडगाव येथील प्राथमिक शिक्षक श्री. जितेंद्र कापडीस यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या सेट परीक्षेत शिक्षण शास्त्र या विषयात पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. प्राथमिक शिक्षक श्री. जितेंद्र कापडीस हे परिवर्तन माध्यमिक विद्यालयातील शिक्षक श्री. नितिन कापडीस यांचे लहान बंधू असून त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व मित्र परिवार, मुख्याध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### सरवड शिवारातू विद्युत उपकरणांची चोरी

**धुळे ।** तालुक्यातील सरवड शिवारात महावितरण कंपनीच्या विद्युत उपकरणांची चोरी झाल्याची घटना उजेडात आली. मंगळवारी निदर्शनास आला. चोरट्यांनी २८८० मीटर वीज तार व बॉक्स पेटीतील तांब्याच्या पट्ट्या असे सुमारे एक लाख रुपयांचे साहित्य चोरून नेले. या प्रकरणी सहायक अभियंता यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोनगीर पोलिस ठाण्यात भारतीय विद्युत अधिनियम २००३ चे कलम १३६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विजयपुर जैताने येथे आज पासून नारिशक्ती प्रशिक्षण वर्ग

**जैताने । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील जैताने विजयपुर येथे महिलांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांना मानणाऱ्या धर्मरक्षक बाजीराव बुवाजी पगारे यांच्या नेतृत्वाखाली व कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी नम्रता बागले, संगीता दुल्लभ जाधव, राजश्री पाटील, वंदना शाह व इतर महिलांनी सहकार्य केले. आज प्रशिक्षण सुरु होईल.

या प्रशिक्षणात तरुणींना लाठी काठी प्रशिक्षण , तलवारबाजी , घटकाचक्र , दंड युद्ध व साखळी गोळा फिरवणे यांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ७ जुलै ते १३जुलै पर्यंत दररोज सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत हे प्रशिक्षण आदर्श विद्या मंदिरच्या प्रांगणात होणार आहे. प्रशिक्षण हे पूर्णपणे मोफत असून सहभागी होणाऱ्या महिला सदस्यांनी भगव्या रंगाची ओढणी परिधान करून प्रशिक्षणामध्ये सहभागी व्हावे.असे आव्हान उदय भदाणे व इंद्रजीत खैरनार यांनी केले आहे.आतापर्यंत १५० युवतींनी नाव नोंदणी केल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

CHANGE NAME

I HAVE CHANGE NAME FROM
OLD NAME:- ANSARI TABASSUM AMEERULLAH
TO
NEW NAME:- TABASSUM PARVEEN AMEERULLAH ANSARI
ADD:- AGRA ROAD LALA SARDAR NAGAR DHULE

CHANGE NAME

I HAVE CHANGE NAME FROM
OLD NAME:- MUDASSIR AMEERULLA ANSARI
TO
NEW NAME:- MUDASSIR AMEERULLAH ANSARI
ADD:- AGRA ROAD LALA SARDAR NAGAR DHULE

## नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी विश्वास ठाकूर

**नाशिक । प्रतिनिधी**





नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, नाशिकच्या अध्यक्षपदी विश्वास को-ऑप.बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांची बिनविरोध निवड करण्यात आलेली आहे.

सदर बैठकीत कार्याध्यक्षपदी वणी मर्चंट्स को-ऑप. बँकेचे अध्यक्ष महेंद्र किसनलाल बोरा यांची तर उपाध्यक्षपदी येवला मर्चंटचे राजेश शांतीलाल भांडगे यांची निवड करण्यात आली. ही नेमणूक श्रीमती मनिषा खैरनार अध्यासी अधिकारी तथा सहायक निबंधक (वर्ग १) अधिन-जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांच्या उपस्थितीत पार पडली. गोविंद नगर येथील बँक असोसिएशनच्या कार्यालयात ही निवड करण्यात आली. नुकतेच असोसिएशनचे २०२३ ते २०२८ साठी संचालक मंडळ बिनविरोध निवडून आलेले आहे. विश्वास ठाकूर यांच्या निवडीसाठी सूचक म्हणून असोसिएशनचे संचालक अजय ब्रम्हेचा होते. दि नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेचे अध्यक्ष दत्ताजी गायकवाड यांनी अनुमोदन दिले. कार्याध्यक्ष पदासाठी महेंद्र बोरा यांच्या निवडीसाठी सूचक म्हणून असोसिएशनचे संचालक नानासाहेब सोनवणे होते. तर असोसिएशनच्या संचालिका डॉ. शशीताई अहिरे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्ष पदासाठी राजेश भांडगे यांच्या निवडीसाठी सूचक म्हणून दि बिझनेस को-ऑप. बँकेचे अध्यक्ष अशोक तापडीया होते. तर मनमाड अर्बन को-ऑप. बँकेचे संचालक संजय वडनेरे यांनी अनुमोदन दिले.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर विश्वास ठाकूर मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, नाशिक जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या अडीअडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने एकत्र येण्याची गरज आहे. त्यातुन केंद्र सरकार व राज्य शासनामार्फत निर्णय तोडगा काढता येईल.

डिसेंबर २०२३ मध्ये नाशिकमध्ये होणार्या सहकार परिषदेसाठी सर्वांचे सहकार्य परिषद यशस्वी होण्यासाठी महत्वाचे ठरणार आहे. परिषदेच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारकडे आपल्याला मागण्यांचा पाठपुरावा करता येईल. तसेच असोसिएशन मार्फत अद्ययावत ट्रेनिंग सेंटर उभारण्यात येणार आहे.

अशोक श्रीकिसनजी झंवर (श्री महेश को-ऑप बँक लि., नाशिक), सुनिल ताबाजी गिते (नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी बँक, नाशिक), शरद किसनराव कोशिरे (श्री गणेश सहकारी बँक लि., नाशिक) हिरालाल सुरजकरण सुराणा (प्रगती अर्बन को-ऑप बँक लि.), नितीन एकनाथ वालखेडे (कळवण मर्चंटस् को-ऑप बँक लि.), कैलास हरी येवला (सटाणा मर्चंटस् को-ऑप बँक लि.), शरद नामदेव दुसाने (मालेगांव मर्चंटस् को-ऑप बँक लि.), राजकुमार चंपालाल संकलेचा (चांदवड मर्चंटस् को-ऑप बँक लि.), मिर्झा सलीमबेग जब्बारबेग (दि फैज मर्कंटाईल को-ऑप बँक लि., नाशिक) आदी बैठकीस उपस्थित होते.

## कॅन्सर निदान शिबीराचा जिल्हा रुग्णालयात शुभारंभ




**धुळे । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड या सेवाभावी संस्थेच्या वतीने पस्तीस वर्षांवरील महिलांसाठी स्तनांचा कॅन्सर व गर्भपिशवीचा कॅन्सर आजारासाठी मोफत मॅमोग्राफी व पॅप्स स्मिअर तपासणी शिबीराचा औपचारिक शुभारंभ साक्री रोडवरील जिल्हा रुग्णालयात आज सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी रोटरी क्लब च्या वतीने अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त सुसज्ज अशा वातानुकूलीत व्हॅन मध्ये महिला डॉक्टर व तंत्रज्ञांनी महिला रुग्णांची तपासणी केली. शिबिराच्या पहिल्या दिवशी महिलांचा चांगला प्रतिसाद लाभला, सदर मोफत आरोग्य तपासणी शिबिर उद्या शुक्रवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड अध्यक्ष रो दिपक अहिरे, सचिव रो सचिन बोरसे, प्रोजेक्ट चेअरमन रो डॉ सुशिल महाजन, प्रोजेक्ट को चेअरमन रो डॉ आशिष छाजेड, रो हर्षित शहा, क्लस्टर सेक्रेटरी डॉ राणू अजमेरा, माजी अध्यक्ष रो सिध्दनाथ गरुड, रो दिनेश खंडीकर, रो कमर शेख, रो अशोक तोटे, हेरंब दाते, संजय जैन, संजय सैंदाणे, जितेंद्र जैन, अमित शहा, विलास वाणी, अनिल चौधरी, सागर थोरात, आनंद कुलकर्णी व अन्य रोटरी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच शिबीराच्या औपचारिक शुभारंभ प्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ स्वप्नील पाटील, स्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ स्वप्नील सांगळे, डॉ महेश भडागे, डॉ अश्विनी भामरे, डॉ रविंद्र सोनवणे डॉ संजय शिंदे, डॉ विशाल पाटील, डॉ प्रियांका पाटील, डॉ दिनेश दहिते, डॉ गितांजली सोनवणे, डॉ सिध्दार्थ चव्हाण, डॉ अभय शिनकर, श्रीमती प्रतिभा घोडके, सुवर्णा सूर्यवंशी, कमलेश परदेशी, किशोर हलगीर पूजा थोरात, सुवर्णा चव्हाण आदी जिल्हा रुग्णालयाचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### शिरपूर येथे खासगी रूग्णालयात काम करणाऱ्या परिचारिकेची आत्महत्या

**शिरपूर ।** शिरडाणे शिरपूर येथे रुग्णालयात काम करणाऱ्या एका परिचारिकेने ओढणीने गळफास लावून आत्महत्या केली.घरमालकाने हॉस्पिटलमध्ये परिचारिकेचे काम करणाऱ्या मुलींना घर भाडे कराराने दिले होते काही महिन्यापूर्वी शिरपूर तालुक्यातील बुडकी येथील सपना सोमा पावरा ही तिथे राहण्यासाठी आली होती सपना पावरा ही राधाकृष्ण हॉस्पिटलमध्ये परिचारिका म्हणून कामाला होती. सोबत राहत असलेल्या मुलींनी तिच्या दरवाजा ठोकून आवाज दिला मात्र आतून कुठलाही आवाज आला नाही त्यांनी दरवाजा उघडला असता सपना पावरा हिचा ओढणीच्या साह्याने गळफास लावलेला मृतदेह आढळून आला.

अँड. स्वप्निल एस. सोंजे
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

र्दि.कि.अर्ज नं ७४८/२०२३

वंदना शामकांत खैरनार वगैरे ........ अर्जदार
विा.
कोणीही नाही
(कै. शामकांत साहेबराव खैरनार (पाटील) -मयत)
...जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि.२३/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं.७४८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी शामकांत साहेबराव खैरनार (पाटील) यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.१९/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं.८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण - धुळे
दिनांक :-०३/०७/२०२३ आदेशावरुन

कामगिरी कारकुन (शिक्का) अधिक्षक
दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं. दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.

## शासन आपल्या दारी अभियानातंर्गत १० जुलैला रोजगार मेळाव्याचे आयोजन

### विविध २० कंपन्यांमध्ये ३०८१ रिक्त पदांसाठी होणार मुलाखती

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे या कार्यालयामार्फत १० जुलै, २०२३ रोजी सकाळी १०.०० ते दु.५.०० वाजेपर्यंत एसआरपीएफ मैदान, सुरत बायपास जवळ, धुळे येथे शासन आपल्या दारी अभियानाअंतर्गत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा (ऑफलाईन-२) आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात दहावी पास किंवा नापास/बारावी/आयटीआय/बीए/बीकॉम/ एमकॉम/ बीएससी/डिप्लोमा इंजिनिअर/बीई/ डिप्लोमा ॲग्री/बीएससी ॲग्री/एमएससी ॲग्री /एमबीए/ एएनएम/या पात्रताधारक उमेदवारांसाठी ३०८१ रिक्तपदे उपलब्ध असून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी विविध २० कंपन्या व आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच कौशल्य विकास व स्वयंरोजगाराबाबत विविध महामंडळांचे स्टॉल्स लावून विविध अर्थसहाय्य योजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये महेंद्र ॲण्ड महेंद्र १५० पदे, मे. डिस्टिल एज्युकेशन ॲड टेक्नॉलॉजी प्रा लि २०० पदे, नवभारत फर्टिलाईजर लि २७ पदे, अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट ६० पदे, आयसीआय बॅक सेल्स ॲकडमी ७० पदे, युवाशक्ती स्किल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड १०० पदे, राज कन्सल्टन्सी सर्व्हिसेस १०० पदे, केडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेड, धुळे १५० पदे, पिपल ट्री व्हेंचर्स प्रा. लि ७० पदे, परम स्किल्स ट्रेनिंग इंडिया प्रायव्हेट लि. औरंगाबाद ५० पदे, टणएडड उजठझ डढऊ६१४ पदे, हिताची एस्टेमो ब्रेक सिस्टीम्स इंडिया प्रा.लि, जळगाव २५० पदे, एक्सेल प्लेसमेंटस ५०० पदे, दर्पण रोजगार केंद्र, जळगाव ५० पदे, प्रोसॉफ्ट प्लेसमेंट्स, धुळे ७५ पदे, जस्ट डायल ५० पदे, नवभारत बायो प्लॉ टेक लि. २० पदे, आरीअन रोप्स प्रा.लि. धुळे ३० पदे, राहूल एन्टरप्राजेस १० पदे, सुझलॉन ऍनजी लि ५ पदे, मायक्रोन लोगी ५०० पदे अशी एकूण ३०८१ रिक्तपदे उपलब्ध आहेत. या मेळाव्यासाठी वरील २० नामांकित कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी उपस्थित राहणार असुन पात्र उमेदवारांच्या चाचणी व मुलाखती घेऊन विविध पदांसाठीच्या रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत. या सुवर्ण संधीचा बेरोजगार उमेदवारांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा. तसेच रोजगार इच्छुक उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी किमान पाच प्रतीत रिझ्युम/बायोडाटा आणि शैक्षणिक कागदपत्रे आधारकार्ड, सेवायोजन नोंदणी छायाप्रतीसह सकाळी १० वाजता उपस्थित राहावे.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापपर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www. rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोकरी साधक म्हणून नोंदणी करावी. तसेच यापूर्वी महारोजगार वेब पोर्टलवर नोंदणी केली असल्यास वरील सुधारीत संकेतस्थळावर आपला १५ अंकी नोंदणी क्रमांक टाकून लॉगीन करावे आणि मोबाईल व आधार क्रमांक पडताळणी करावी. तसेच, या वेबपोर्टलवर लॉग-इन करुन जॉब फेअर टॅबवर क्लिक करुन शासन आपल्या दारी अभियानाअंतर्गत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा (ऑफलाईन- २) या मध्ये जाऊन पात्रतेप्रमाणे विविध कंपन्याच्या उपलब्ध रिक्तपदांसाठी ॲप्लाय करावे. यासाठी काही अडचण आल्यास कार्यालयीन दुरध्वनी व व्हॉटस्अप क्रमांक ०२५६२-२९५३४१ वर संपर्क करावा. या मेळाव्यास नोकरी इच्छूक उमेदवारांनी उपस्थित राहुन मुलाखती द्याव्यात आणि या रोजगार संधीचा लाभ घ्यावा. असे आवाहन रा. नि. वाकुडे, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, धुळे यांनी केले आहे.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था Admission Open
**विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे**
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र





# बचत गटांमुळे झाला ग्रामीण भागातील महिलांचा विकास : दर्शना पवार














धुळे

। महाराष्ट्र शासन अंगीकृत महिला आर्थिक विकास महामंडळ धुळे द्वारा स्थापित कल्पतरू लोकसंचलित साधन केंद्र शिंदखेडा यांची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सदर वार्षिक सभेला किमान तीस  गावांमधून नऊशे च्या पुढे महिला उपस्थित होत्या. कल्पतरू लोकसंचालित साधन केंद्र रजिस्टर संस्था असून जवळपास अडीच हजार महिलांसोबत चाळीस गावांमध्ये काम करत आहे. या संस्थेच्या आर्थिक वर्षामध्ये वर्षभरात काय काम केली, कोणत्या महिलांना कोणकोणत्या गोष्टींचे लाभ मिळवून दिले, शासनाच्या कोणकोणत्या योजना राबवल्या गेल्या, व मागील वर्षभरात झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी व पुढील वर्षात करावयाचे नियोजन याविषयी सविस्तर मांडणी सदर वार्षिक सर्वसाधारण सभेत करून घेण्यात आली. सदर कार्यक्रमाला प्रमुख उद्घाटक व अध्यक्ष संदीप मराठे जिल्हा समन्वय अधिकारी मावीम धुळ,  एडवोकेट चंद्रकांत येशिराव अध्यक्ष दामिनी महिला अन्याय अत्याचार निवारण केंद्र धुळे, श्रीमती दर्शना पवार सामाजिक कार्यकर्ता, नानासाहेब अहिरे मंडळाधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय शिंदखेडा, संदीप बच्छाव आयसीआयसीआय बँक सेल्स मॅनेजर , मावळत्या अध्यक्ष जिजाबाई शिंदे, मावळते सचिव नलिनीताई पाटील बऱ्याच गावांचे सरपंच इत्यादी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपापल्या विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजना व त्यांची होणारी अंमलबजावणी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. श्रीमती दर्शना पवार मॅडम यांनी महिलांची सद्यस्थिती काय आहे आपण काय बदल करून घेतले पाहिजे याविषयी सखोल असे अहिराणी भाषेत मार्गदर्शन केले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# स्थायी सभेत विरोधक नगरसेवकांचा संताप; वादामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण



















धुळे । महापालिकेकडून आकारण्यात आलेल्या वाढीव घरपट्टीमुळे शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड रोष आहे. याविरोधात आमदारांनीही दोन दिवसांपुर्वी उपोषण केले. यासंदर्भात स्थायी समितीच्या सभेत सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर प्रशासनाने खुलासा केला. त्यात सांगितले की, वाढीव घरपट्टीबाबत खा.डॉ.सुभाष भामरे यांनी महापालिकेत बैठक घेतली होती. यासंदर्भात ते मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री स्तरावर बैठक घेणार आहेत. कारण हा शासनस्तरावरील विषय आहे. तथापि, १० जुलै रोजी मुख्यमंत्री धुळ्यात येणार असल्याने त्यानंतर लवकरच बैठक आयोजित केली जाईल. व बैठकीत जो निर्णय होईल, त्या निर्णयाची महापालिकेकडून अंमलबजावणी केली जाईल, असा खुलासा प्रशासनाने केला. दरम्यान, पुढील काळात निवडणूक असल्याने धुळेकरांना वाढीव घरपट्टीपासून दिलासा मिळण्याची शक्यता यातून व्यक्त होत आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, नगरसचिव मनोज वाघ, उपायुक्त संगिता नांदुरकर, पल्लवी शिरसाठ, सदस्य हर्षकुमार रेलन, सुनिल बैसाणे, किरण अहिरराव, कल्याणी अंपळकर, साबीर खान, वसीम बारी, नाजियाबानो पठाण, फातेमा अन्सारी, विजय जाधव, दगडू बागुल, रंगनाथ ठाकरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विषय पत्रिकेवर एकूण नऊ विषय होते. - वाहतूकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण काढावे अन्यथा सत्ताधारी असलो तरी मुख्यमंत्र्यांना निवेदन देवू, असा इशारा भाजपाचे माजी सभापती सुनिल बैसाणे यांनी आज स्थायी समितीच्या सभेत दिला. शहराच्या पाणी प्रश्नावर आज पुन्हा एकदा विरोधकांनी भाजपावर निशाणा साधला यामुळे सत्ताधारी विरोधक भिडले. नगरसेवक सुनिल बैसाणे यांच्याशी काँग्रेसचे वसीम बारी, साबीर भंगारवाले यांचा जोरदार शाब्दीक वादही झाला. यासह मालमत्ता करासंदर्भात आज स्थायी समितीच्या महासभेमध्ये चर्चा झाली. मालमत्ता कराचा फेरविचार करावा व धुळेकरांना दिलासा द्यावा अशी मागणी सदस्यांच्या वतीने करण्यात आली.

**संकलन : दिपक वाघ**